**भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र**

जा.क्र. १५४/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक २६/०३/२०१८

**१) संगनमत करून भांडण करून अश्लिल शब्दात शिवीगाळ करून जिवाने मारण्याची धमकी दिल्याने गुन्हा नोंद:--**

दिंनाक २५/०३/२०१८ चे १०.३० वाजता दरम्यान यातील फिर्यादी हा आपले गावातील लोकांसह चहा पिण्याकरीता पाणठेल्यावर गेला असता, यातील आरोपीतांनी संगनमत करून यातील आरोपी क्र. १ याने फिर्यादीस पुर्नवसन सांबधात झालेल्या मिटींगमध्ये आम्हाला पाहुन हे कशाला आले असे का बोलला? म्हणुन भांडण करून आरोपी क्र. २ ते ४ याने फिर्यादीस अश्लिल शब्दात शिवीगाळ केली व आरोपी क्र. १ याने फिर्यादीचे कॉल्लर पकडुन ढकल्याने फिर्यादीचे डोक्याला मार लागला व आरोपीतांनी जिवाने मारून टाकण्याची धमकी दिल्याने, फिर्यादी बबलु गजानन वाघमारे वय ४० वर्ष रा. परसोडी यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन पवनी येथे कलम २९४,३२३,५०६,३४ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना. बिसने पोलीस स्टेशन पवनी हे करीत आहेत.

**२) गैरकायदयाची मंडळी जमवुन जिवे मारण्याची धमकी देवुन घरातील सामानाचे नुकसान केल्याने गुन्हा नोंद:--**

दिंनाक २४/०३/२०१८ चे १८.०० वाजता यातील आरोपीतांनी गैरकायदयाची मंडळी जमवुन फिर्यादीचे घरात प्रवेश करून फिर्यादीला तु मला मारण्यासाठी विरू फुले हयाला टिप का दिली? या कारणा वरून हात--बुक्यांनी मारून व चाकु हातात घेवुन जिवे मारण्याची धमकी दिली व फिर्यादीचे घरातील सामान, सायकल खिडकी तोडुन नुकसान करून कि १५,०००/रु ची नुकसान केल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम १४७,१४८,१४९,४५२,५०४,५०६,३२३,४२७ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. उबाडे पोलीस स्टेशन तुमसर हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

**३) मोटार पंपची चोरी:--**

दिंनाक १९/०३/२०१८ चे ११.३० ते दि. २३/३/२०१८ चे १३.०० वाजता यातील फिर्यादीने शेतीला पाणी देण्याकरीता नाल्यात लावलेली ५ एचपी. इगो ३७५६१ क्रमांकाची एल.एस. कंपनीची पाणबुडी मोटार पंप कि. १०,०००/रु. ची कुणीतरी अज्ञात चोराने कुनीही नसल्याची संधी साधुन चोरून नेल्याने फिर्यादी आशिष बाळकृष्ण ठाकरे वय २७ वर्ष रा.तामसवाडी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन सिहोरा येथे कलम ३७९ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. डोंगरे पोलीस स्टेशन सिहोरा हे करीत आहेत.

**४) भरधाव वेगाने ट्रक चालवुन दुस--या ट्रकला धडक मारून ट्रकचे नुकसान केल्याने गुन्हा नोंद:--**

दिंनाक २५/०३/२०१८ चे १४.०० वाजता यातील आरोपीचा ट्रक क्र. एमएच ०४ एचएस ०४५३ चा चालक आबीन याने ब्रेकर्सवर आपले वाहनाची गती कमी केले असता, यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील ट्रक हयगयीने व लापरवाहीने, भरधाव वेगाने चालवुन फिर्यादीचे ट्रकला मागेहुन धडक मारून ट्रकचे नुकसान केल्याने फिर्यादी जावेद रहमुद्दीन खान वय २५ वर्ष रा. घाटनीका पो.स्टे. पाहाडी जिल्हा भरतपुर यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम २७९ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. चेके पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

**५) आमरोड वर येणा--या जाणा--या वाहतुकीस व लोकांच्या जिवितास धोका निर्माण होईल अशा स्थितीत वाहन उभी करून मिळून आल्याने गुन्हा नोंद :--**

दिनांक २५/०३/२०१८ चे १४.०० वाजता दरम्यान यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील मॅक्स वाहन हा गोबरवाही दवाखाना चौक येथे आमरोडवर येणाऱ्या जाणाऱ्या वाहतुकीस व लोकांच्या जिवीतास धोका निर्माण होईल अशी उभी करुन मिळुन आल्याने सरतर्फे फिर्यादी पोना.इंगोले यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन गोबरवाही येथे कलम २८३ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना. इंगोले पो.स्टे. गोबरवाही हे करीत आहेत.

**६) विहीरीचे पाण्यात उडी घेवुन बुडुन महिलेचा मृत्यु :--**

दिंनाक २५/०३/२०१८ चे १४.०० वाजता दरम्यान यातील मृतक सौ. सुनिता चंद्रकुमार घरडे वय ४५ वर्ष रा. वडेगाव ही बबलु दुरूगकर यांचे शेतात शेळया चारण्यास गेली असता, पागल पनाचे भरात विहीरीचे पाण्यात उडी घेवुन बुडुन मरण पावल्याने फिर्यादी चंद्रकुमार शिताराम घरजारे वय ५१ वर्ष रा. वडेगाव यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन आंधळगाव पुढील तपास सफौ. दिक्षीत पोलीस स्टेशन आंधळगाव करीत आहेत.

**७) अवैध दारु अडड्यांवर धाडी .   :--**

दिनांक २५/०३/२०१८ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पोलीस स्टेशन गोबरवाही येथे अवैध दारु अडड्यावर धाडी घालुन एकुण ०१ गुन्हे दाखल करून आरोपीतांच्या ताब्यातुन १० लिटर हातभट्टी दारु किंमती ६००/--रु. चा माल जप्त करण्यात आला.

**८) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :--**

दिनांक २५/०३/२०१८ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण १७० प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून अवैध प्रवासी ०५ त्यापैकी तीन सिटर वाहनाकरीता ०९ ईतर वाहनांवरती -- १५६ केसेस करण्यात आले आहे.

(मपोउपनि.प्रणती लांजेवार)
महिती कक्ष भंडारा
दुरध्वनी.क्र. ८८०५६५७२६२

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.